RNI No. MAHBIL/2012/44835
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग एक – नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - १५, अंक - ३०] गुरुवार ते बुधवार, जुलै २३ - २९, २०२६ / श्रावण १ - ७, शके १९४८ [पृष्ठे ६५

प्राधिकृत प्रकाशन

शासकीय/संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

आदेश

दिनांक २९ जून २०२६

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६

क्रमांक टीपीएस-३५२६/८०/प्र.क्र. २७/२०२६/नवि-९.—ज्याअर्थी, जळगाव महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) (यात यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ चे उप-कलम *(१)* अन्वये शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्रमांक टीपीएस-३५९९/७३८/प्र.क्र. १४२ (अ)/नवि-९, दिनांक ११ फेब्रुवारी २००२ अन्वये मंजूर केली असून ती दिनांक ७ एप्रिल २००२ पासून अंमलात आली आहे (यात यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधिले आहे) व सारभूत स्वरूपांच्या वगळलेल्या भागाची पुनर्प्रसिद्ध विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-३५०३/४९३/प्र.क्र. १०२ (अ)/०३/नवि-९, दिनांक १० ऑगस्ट २००४ अन्वये मंजूर झाली असून दिनांक १ ऑक्टोबर २००४ पासून अंमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये सोबतच्या परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मौजे मेहरुण, जिल्हा जळगाव येथील सर्व्हे क्रमांक १८१/३/३ (पै.), १८१/३/४ (पै.), १८१/३/५ (पै.) मधील एकूण ९६४८.८२ चौरस मीटर जागेवर (यात यापुढे "उक्त जागा" असे संबोधिले आहे) "आरक्षण क्रमांक १५५- भाजी मंडई व दुकान केंद्र" (भागश:) आणि "आरक्षण क्रमांक १५६-नगर भवन व वाचनालय" (भागश:) (यात यापुढे "उक्त आरक्षणे" असे संबोधिले आहे) म्हणून आरक्षित असून उक्त आरक्षणांकरिता समुचित प्राधिकरण जळगाव महानगरपालिका (यात यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असे संबोधिले आहे) आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त जागा, उक्त विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षांच्या कालावधीमध्ये संपादन केल्या नाहीत ;

आणि ज्याअर्थी, उक्त जागेच्या मालकाने उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे उप-कलम *(१)* नुसार, उक्त समुचित प्राधिकरणावर दिनांक ७ डिसेंबर २०१८ रोजीची सूचना (यात यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिले आहे) बजावून उक्त जागा, उक्त प्राधिकरणाने विहित कालावधीत संपादन केली नसल्याचे कळविले होते ;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यानंतरही उक्त समुचित प्राधिकरणाने विहित कालावधीत उक्त जागा संपादन केली नाही अथवा त्या संपादन करण्यासंबंधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६ *(४)* सह भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिद्ध केलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त जागेच्या मालकांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर येथे रिट याचिका क्रमांक ७७८१/२०२१ दाखल केली असून सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिनांक १९ सप्टेंबर २०२४ रोजी अंतिम निर्णय पारित केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यापासून, उक्त समुचित प्राधिकरणाने विहित कालावधीत उक्त जागा संपादन केली नाही अथवा उक्त जागा संपादन करण्यासंबधीची, उक्त अधिनियमाचे कलम १२६ *(४)* सह भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिद्ध केलेली नाही. त्यामुळे या परिस्थितीत उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* मधील तरतुदीनुसार उक्त जागेवरील उक्त आरक्षण/रस्ते व्यपगत झाले असल्याचे शासनाचे मत झाले आहे.

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* नुसार प्राप्त अधिकारात राज्य शासन, जळगाव शहर महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेतील मौजे मेहरुण, जिल्हा जळगाव येथील सर्व्हे क्रमांक १८१/३/३ (पै.), १८१/३/४ (पै.), १८१२/३/५ (पै.) मधील "आरक्षण क्रमांक १५५-भाजी मंडई व दुकान केंद्र" (भागश:) (अंदाजे क्षेत्र ५४७२.५० चौरस मीटर) आणि "आरक्षण क्रमांक १५६-नगर भवन व वाचनालय" (भागश:) (अंदाजे क्षेत्र ४१७६.३२ चौरस मीटर) व्यपगत झाल्याचे अधिसूचित करीत आहे व अशाप्रकारे उक्त आरक्षणे यामधून मुक्त झालेली जमीन या संबंधित जमीनमालकास, खालील अटींच्या अधीन राहून उक्त विकास योजनेतील लगतच्या अनुज्ञेय भूवापराप्रमाणे अन्यथा अनुज्ञेय असलेल्या विकासाकरिता उपलब्ध होईल ;

अट क्रमांक १- सूचनाकर्ते यांनी सूचनेंतर्गत उक्त आरक्षित जागेचा अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा सादर केलेला नसल्याने, प्रस्तुत आदेशामध्ये नमूद क्षेत्राबाबत भविष्यात कोणताही वाद अगर तक्रार उद्‌भवल्यास त्यास अर्जदार स्वत: जबाबदार राहतील.

अट क्रमांक २- प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने भाग नकाशे अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित जमीन मालकांनी उक्त सूचनेखालील त्यांच्या जागेचा, भूमी अभिलेख विभागाकडील अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा जळगाव महानगरपालिकेस तसेच सहायक संचालक, नगररचना, जळगाव शाखा, जळगाव यांना सादर करणे आवश्यक राहील.

परिशिष्ट

अ. क्र.	गावाचे नाव व सर्व्हे क्रमांक	जमिनीचा सर्व्हे क्रमांक/ हिस्सा क्रमांक	उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* अन्वये व्यपगत होणारे क्षेत्र	मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव
१	२	३	४	५
१	मौजे मेहरुण, तालुका-जिल्हा जळगाव.	सर्व्हे क्रमांक १८१/३/३ (पै.), १८१/३/४ (पै.), १८१/३/५ (पै.).	उक्त आरक्षणांनी बाधित होणारे ९६४८.८२ चौ.मी. क्षेत्र.	"आरक्षण क्रमांक १५५- भाजी मंडई व दुकान केंद्र" (भागश:) (अंदाजे क्षेत्र ५४७२.५० चौ.मी.) आणि "आरक्षण क्रमांक १५६-नगर भवन व वाचनालय" (भागश:) (अंदाजे क्षेत्र ४१७६.३२ चौ.मी.).

प्रस्तुत आदेशान्वये उक्त आरक्षणांमधून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणाऱ्या भाग नकाशाची प्रत आयुक्त, जळगाव महानगरपालिका, जळगाव यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात आली आहे.

प्रस्तुतचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** (कायदे/नियम) या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

कुणाल मेमाणे,
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT
Mantralaya, Mumbai - 400 032

ORDER

Dated 29th June 2026

The Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966

No. TPS-3526/80/CR-27/2026/UD-9.– Whereas, the Development Plan of the Extended Area of the Jalgaon City Municipal Corporation has been sanctioned by the Government under the provisions of Section 31 *(1)* of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 (Mah. Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No. TPS-3599/738/CR-142(A)/ UD-9, dated the 11th February 2002 and has come into force with effect from dated the 7th April 2002 (Hereinafter referred to as "the said Development Plan") and the Republished Development Plan of the Excluded Part of substantial nature modifications has been sanctioned *vide* Notification No. TPS-3503/493/CR-102(A)/03/UD-9, dated 10th August 2004 and has come into force with effect from dated the 1st October 2004;

and whereas, in the said Development Plan, the land admeasuring 9648.82 Sq. mtrs. bearing Survey Nos.181/3/3 (Pt.), 181/3/4(Pt.) and 181/3/5 (Pt.) of Mauje Mehrun (hereinafter referred to as "the said Land") is reserved as "Site No.155-Vegetable Market and Shopping Centre" (Part) and "Site No.156-Town Hall and Library" (Part) (hereinafter referred to as "the said Reservations") and the Jalgaon City Municipal Corporation is Appropriate Authority for the said Reservations (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

and whereas, the said Land has not been acquired by the said Appropriate Authority within ten years from the date on which the said Development Plan came into force;

and whereas, the Owner of the land bearing Survey Nos.181/3/3 (Pt.), 181/3/4 (Pt.) and 181/3/5 (Pt.) of Mauje Mehrun in reference to the said Reservations had served a notice dated the 7th December 2018 under Section 127 *(1)* of the said Act to the said Appropriate Authority, being the Planning Authority (hereinafter referred to as "the said Notice");

and whereas, even after service of the said Notice as aforesaid, the said Land had neither been acquired, within prescribed time period nor the Notification of land acquisition required under Section 126 *(4)* of the said Act read with Section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013, has been published by the said Appropriate Authority within prescribed time period from the date of the service of the said Notice under sub-section *(1)* of Section 127 of the said Act;

and whereas, the owner of the said Land has filed Writ Petition No. 7781/2021 before the Hon'ble Bombay High Court, Aurangabad Bench, Chhatrapati Sambhajinagar and the final order is passed on dated the 19th September 2024 by the Hon'ble High Court;

and whereas, it is observed that, the said Land had neither been acquired, within prescribed time period from the date of the service of the said Notice, nor Notification of land acquisition required under Section 126 *(4)* of the said Act, read with Section 19 of the Right to fair Compensation of Transparency

in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 been published within prescribed time period by the said Appropriate Authority and, in consequence thereof, the Government of Maharashtra is of opinion that, the said Reservation, on the said Land stands lapsed as per the provisions of Section 127 *(1)* of the said Act.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (2) of Section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, as mentioned in the Annexure below, hereby notifies that, the said Reservations *i.e.* "Site No. 155- Vegetable Market and Shopping Centre" (Part) (5472.50 Sq. mtrs.) and "Site No. 156-Town Hall and Library" (Part) (4176.32 Sq. mtrs.) as specified in the Sanctioned Development Plan of the Extended Area of Jalgaon City Municipal Corporation, stands lapsed and the area so released will be available to the owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Development Plan, subject to following conditions :

Condition No. 1- Since the Noticer have not submitted a recent and certified measurement sheet of the said Land, the Notice themselves will be responsible for any dispute or complaint arising in the future regarding the area mentioned in the this Order.

Condition No. 2- Before authenticating the part plan in accordance with the very Order, the concerned land owner will be required to submit a recent and certified measurement sheet of their proposed area from the Land Records Department to the offices of the Commissioner, Jalgaon Municipal Corporation, Jalgaon and the Assistant Director of Town Planning, Jalgaon Branch, Jalgaon.

Annexure

Sr. No.	Name of the Village, Taluka and District	Survey No./ Hissa No.	Area lapsed under Section 127 *(2)* of the said Act	Reservation of sanctioned Development Plan
1	2	3	4	5
1	Mauje Mehrun, taluka and district Jalgaon.	Survey Nos. 181/3/3 (Pt.), 181/3/4 (Pt.) and 181/3/5 (Pt.).	Area lapsed under the said Reservations admeasuring 9648.82 Sq.mtrs.	"Site No.155- Vegetable Market and Shopping Centre" (Part) (5472.50 Sq. mtrs.) and "Site No. 156-Town Hall and Library" (Part) (4176.32 Sq. mtrs.).

A copy of the Part Plan, showing the area of the said Reservation / Roads, which has been lapsed *vide* this Order, is available in the offices of the Commissioner, Jalgaon City Municipal Corporation, district Jalgaon, during office hours on all working days for inspection of public for the period of one month.

This Order shall also be published on the Government website **www.maharashtra.gov.in** (Acts/ Rules).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KUNAL MEMANE,
Section Officer to Government.

———————

संचालक, नगररचना यांजकडून

नरगरचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

आदेश

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६

क्रमांक डी.टी.पी./वि.यो. शहादा/कलम १२७ *(२)*/आदेश/स.नं. ५२ पै. /प्र.क्र. २९३/टीपीव्ही-४/३४६३/सन २०२६.-ज्याअर्थी, शहादा नगरपरिषदेची विकास योजना (वाढीव हद्द) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) (यात यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ *(१)* मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१००३/३८७/प्र.क्र.४ ई/०५/नवि-९, दिनांक २५ जुलै २००६ अन्वये मंजूर केली असून, ती दिनांक ११ सप्टेंबर २००६ पासून अंमलात आलेली आहे (यात यापुढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील, मौजे मलोणी, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार येथील सर्व्हे नंबर ५२ पै. "आरक्षण क्रमांक १०- प्राथमिक शाळा" व "आरक्षण क्रमांक १३- बगीचा" तसेच पूर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर असे दोन १२ मीटर रुंदीचे रस्ते या विकास योजना (यात यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिले आहे) आरक्षणांनी बाधित होत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाचे भूसंपादन व विकासासाठी समुचित प्राधिकरण हे नगरपरिषद, शहादा (यात यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षांच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनीचे संपादन केलेले नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाने बाधित होणाऱ्या मौजे मलोणी, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार येथील येथील सर्व्हे नंबर ५२/१ व ५२/२-ब या जमिनीमधील क्षेत्राबाबत (यात यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) उक्त जमिनीच्या जमीन मालकाने (यात यापुढे "उक्त जमीन मालक" असे संबोधिले आहे) दिनांक ५ जुलै २०१७ रोजी उक्त समुचित प्राधिकरणावर उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* चे तरतुदीन्वये सूचना (यात यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिले आहे) बजावलेली असून ती उक्त समुचित प्राधिकरणास दिनांक ५ जुलै २०१७ रोजी प्राप्त झाली होती ;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा उक्त जमिनीचे संपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७ *(१)* मधील तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना करण्यात आलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगरपरिषद, शहादा यांनी पत्र क्रमांक २१७२/२०२४-२५, दिनांक १७ सप्टेंबर २०२५ व पत्र क्रमांक १३९८/२०२५-२६, दिनांक २ जून २०२६ अन्वये सहायक संचालक, नगररचना, नंदुरबार शाखा, नंदुरबार यांनी पत्र क्रमांक ५४, दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ अन्वये तसेच सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक यांनी पत्र क्रमांक ३२७, दिनांक १३ एप्रिल २०२६ अन्वये प्रकरणी उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* चे तरतुदीन्वये आदेश निर्गमित करणे योग्य होणार असल्याचे कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे उप-कलम *(१)* चे तरतुदीनुसार उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले असून, उक्त अधिनियमाच्या कलम १२७ चे उप-कलम *(२)* चे तरतुदीनुसार, उक्त जमीन मालकाच्या उक्त जमिनीवरील १२ मीटर विकास योजना रस्त्याखालील क्षेत्र वगळता उर्वरित उक्त आरक्षण क्षेत्र व्यपगत झाल्याबाबत आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्रमांक टीपीएस-१८१३/३२११/प्र.क्र.५०८/नवि-१३, दिनांक १ डिसेंबर २०१६ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरण असलेल्या नगरपरिषदा/नगरपंचायती आणि जिल्हा परिषद यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* चे तरतुदीन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार उक्त अधिनियमाच्या कलम १५१ चे तरतुदीन्वये संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* चे तरतुदीन्वये संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे या आदेशान्वये पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त अधिसूचनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झालेले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत.

अटी

अट क्रमांक १- सूचनाकर्ते यांनी त्यांचे सूचनेंतर्गत जागेचा अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा सादर केलेला नसल्याने सदर आदेशामध्ये नमूद क्षेत्राबाबत भविष्यात कोणताही वाद अगर तक्रार उद्‌भवल्यास त्यास अर्जदार स्वत: जबाबदार राहतील.

अट क्रमांक २- सदरच्या आदेशाच्या अनुषंगाने भाग नकाशे अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित जमीन मालकांनी सूचनेखालील त्यांचे जागेचा भूमी अभिलेख विभागाकडील अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा संबंधित नियोजन प्राधिकरणास सादर करणे आवश्यक राहील.

परिशिष्ट

अ. क्र.	नगरपरिषद, मौजे, तालुका व जिल्हा	उक्त मंजूर विकास योजनेतील आरक्षण व विकास योजना अहवालानुसार अंदाजे क्षेत्र	उक्त सूचनेखालील उक्त जमिनींचा तपशील	उक्त आरक्षणाचे व्यपगत झालेले अंदाजे क्षेत्र
१	२	३	४	५
१	नगरपरिषद, शहादा, मौजे मलोणी, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार.	आरक्षण क्रमांक १०- "खेळाचे मैदान" (क्षेत्र १७५०० चौ.मी.).	सर्व्हे नंबर ५२ पै.	सूचनाकर्ते यांचे सूचनेनुसारचे बाधित क्षेत्र.
२	नगरपरिषद, शहादा, मौजे मलोणी, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार.	आरक्षण क्रमांक १३- "बगीचा" (क्षेत्र ४९०० चौ.मी.).	सर्व्हे नंबर ५२ पै.	सूचनाकर्ते यांचे सूचनेनुसारचे बाधित क्षेत्र.

टीप : (१) उक्त आरक्षणातून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर व मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकांस उपलब्ध होईल.

(२) उक्त आरक्षणातून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणाऱ्या उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा मुख्याधिकारी, शहादा नगरपरिषद, शहादा, जिल्हा नंदुरबार यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ १ महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

(३) सदर आदेश संचालनालयाच्या **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

जितेंद्र लक्ष्मणराव भोपळे,
संचालक, नगररचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे, २३ जून २०२६.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

Town Planning and Valuation Department

ORDER

The Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966

No. D.T.P/D.P.Shahada/Sec.-127*(2)*/Order/S.No.52P/C.R.No.293/TPV-IV/3463/2026.– Whereas, the Revised Development Plan (Extended Limit) of Shahada Municipal Council has been sanctioned under the provisions of Section 31 *(1)* of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 (Mah. Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as ""the said Act") by the Government in Urban Development Department *vide* it's Notification No. TPS-1003/387/C.R.4/05/UD-09, dated

25th July 2006 and the same has come into force with effect from dated 11th September 2006 (hereinafter referred to as "the said sanctioned Development Plan");

and whereas, in the said sanctioned Development Plan, the land bearing S. No. 52 Pt. of Mouje Maloni, taluka Shahada, district Nandurbar is affected by Reservation No. 10, namely "Primary School", and the land bearing S. No. 40 Pt. is affected by Reservation No. 13, namely "Garden" also Two Development Plan Roads, East-West and the other South-North each 12 meters wide (hereinafter referred to as "the said Reservation");

and whereas, the Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservation is the Municipal Council, Shahada (hereinafter referred to as "the said Apropriate Authority");

and whereas, the said Appropriate Authority has not acquired the land under the said Reservation within a period of 10 (ten) years from the date on which the said Reservation came into force;

and whereas, the owner of the land (hereinafter referred to as "the said Land Owner") affected by the said Reservation in respect of the land bearing Mouje Maloni, taluka Shahada, District Nandurbar, bearing S. No. 52/1 and 52/2-B (hereinafter referred to as "the said Land") had served a Notices to Appropriate Authority on dated 5th July 2017 under the provision of Section 127 *(1)* of the said Act (hereinafter referred to as "the said Notice") which was received by the said Appropriate Authority on dated 5th July 2017;

and whereas, the said Land under the said Reservation is not aquired or no steps for acquisition of the said Land as required under the provisions of Section 127 *(1)* of the said Act have been taken by the said Appropriate Authority, within a stipulated period after the date of service of the said Notice;

and whereas, the Chief Officer, Shahada Municipal Council, Shahada *vide* letter No. 2172/2024-25, dated 17th September 2025 and *vide* letter No.1398/2025-26, dated 12th June 2026 the Assistant Director, Town Planning, Nandurbar Branch, Nandurbar *vide* letter No. 54, dated 13th February 2026 and Joint Director, Town Planning, Nashik Division, Nashik *vide* letter No. 327, dated 13th April 2026 has informed that it would be appropriate to issue a notification under the provisions of Section 127 *(2)* of the said Act in the matter;

and whereas, in accordance with the provisions of Section 127 *(1)* of the said Act, the said Reservation on the said Land has lapsed, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, except the area under the 12 mtrs. Development Plan Road, it is necessary to issue an order under the provisions of Section 127 *(2)* of the said Act, regarding the lapsing of the said Reservation on the said Land of the said Land Owner;

and whereas, the Government in Urban Development Department under the provisions of Section 151 of the said Act *vide* Resolution No.TPS-1813/3211/C.N.508/UD-13, dated 1st December 2016, has delegated the powers exercisable by it to take action under the provisions of Section 127 *(1)* of the said Act to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune in respect of the Development Plans of all Municipal Councils/Nagarpanchayats and Zilla Parishads as a Planning Authority.

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune by this order and as mentioned in the schedule hereinafter hereby notifies the lapsing of the said Reservation in respect

of the said Land in the said sanctioned Development Plan under the provision of Section 127 *(2)* of the said Act and for that purpose amends the said Notification, as follows:

Conditions

Condition No. 1- Since the proposer has not submitted an up-to-date and certified survey map of the site in question, the applicant shall be solely responsible for any future disputes or complaints arising regarding the area specified in this order.

Condition No. 2- Prior to the authentication of the layout maps pursuant to this order, the concerned land owners must submit an up-to-date and certified survey map of the site (issued by the Land Records Department) to the relevant Planning Authority.

Schedule

Sr. No.	Municipal Council, Mouje, Taluka and District	Reservation of the said sanctioned Development Plan and it's Approximate Area as per D.P. Report	Description of the said Land under the said Notice	Approximate Area lapsed from the said Reservation
1	2	3	4	5
1	Municipal Council Shahada, Mouje Maloni, taluka Shahada, district Nandurbar.	Res. No. 10- "Playground" (Area 17500 Sq.m.).	S. No. 52 Pt.	Affected area of Noticer as per said Notice.
2	Municipal Council Shahada, Mouje Maloni, taluka Shahada, district Nandurbar.	Res. No. 13- "Garden" (Area 4900 Sq.m.).	S. No. 52 Pt.	Affected area of Noticer as per said Notice.

Note : (1) The said Land so released from the said Reservation shall become available to the said Land owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said sanctioned Development Plan.

(2) A copy of the Part Plan of the said sanctioned Development Plan showing the area of the said Land which are lapsed from the said Reservation, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Shahada, district Nandurbar during office hours on all working days for inspection to public up to One month.

(3) This Order shall also be published on the Directorate's official website **www.dtp.maharashtra.gov.in**

JITENDRA LAXMANRAO BHOPLE,
Director of Town Planning,
Maharashta State, Pune.

Pune, 23rd June 2026.

संचालक, नगररचना यांजकडून

नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६

आदेश

क्रमांक डी.टी.पी./वि.यो. नंदुरबार/कलम १२७*(२)*/आदेश/सर्व्हे नंबर ६८९ पै./जु.सर्व्हे नंबर १३९ पै./प्र.क्र. २१७/टीपीव्ही-४/३२९८/सन २०२६.— ज्याअर्थी, नंदुरबार नगरपरिषदेची सुधारित विकास योजना (मूळ हद्द + वाढीव हद्द) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) (यात यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ *(१)* मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१५०४/३००१/प्र.क्र. ६६/०५(ब)/नवि-०९, दिनांक १४ मार्च २००७ अन्वये मंजूर केली असून, ती दिनांक ३० एप्रिल २००७ पासून अंमलात आलेली आहे (यात यापुढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील मौजे नंदुरबार, तालुका व जिल्हा नंदुरबार येथील सर्व्हे नंबर १३९ पै., सर्व्हे नंबर १४० पै., सर्व्हे नंबर १४८ पै., सर्व्हे नंबर ५७० पै. या जमिनींचे क्षेत्र "आरक्षण क्रमांक ११- खेळाचे मैदान" (यात यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिले आहे) आरक्षणांनी बाधित होत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाचे भूसंपादन व विकासासाठी समुचित प्राधिकरण हे नगरपरिषद, नंदुरबार (यात यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असे संबोधिले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षांच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनीचे संपादन केलेले नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाने बाधित होणाऱ्या मौजे नंदुरबार, तालुका व जिल्हा नंदुरबार येथील येथील संगणकीय सर्व्हे नंबर ६८९/९८ पै. (जुना सर्व्हे नंबर १३९-अ+ब/१ ते ६-अ, प्लॉट नंबर ९८) या जमिनीमधील क्षेत्राबाबत (यात यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) उक्त जमिनीच्या जमीन मालकाने (यात यापुढे "उक्त जमीन मालक" असे संबोधिले आहे) दिनांक २४ ऑगस्ट २०२० रोजी उक्त समुचित प्राधिकरणावर उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* चे तरतुदीन्वये सूचना (यात यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिले आहे) बजावलेली असून ती उक्त समुचित प्राधिकरणास दिनांक २४ ऑगस्ट २०२० रोजी प्राप्त झाली होती ;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा उक्त जमिनीचे संपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७ *(१)* मधील तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना करण्यात आलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगरपरिषद, नंदुरबार यांनी पत्र क्रमांक १०४५/२०२३, दिनांक ५ सप्टेंबर २०२३ व पत्र क्रमांक ११६६/२०२४, दिनांक ७ ऑगस्ट २०२४ अन्वये, सहायक संचालक, नगररचना, नंदुरबार शाखा, नंदुरबार यांनी पत्र क्रमांक ११०३, दिनांक २३ सप्टेंबर २०२५ अन्वये तसेच सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक यांनी पत्र क्रमांक १८८५, दिनांक १२ डिसेंबर २०२५ अन्वये प्रकरणी उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* चे तरतुदीन्वये आदेश निर्गमित करणे योग्य होणार असल्याचे कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, सूचनेच्या अनुषंगाने प्रकरणातील वस्तुस्थिती, सूचनेची प्राप्ती व भूसंपादन प्रक्रियेबाबत झालेल्या कार्यवाहीची पुन:खातरजमा करण्यासाठी मा. संचालक, नगररचना यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ८ जून २०२६ रोजी ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस सूचनाकर्ते, नियोजन प्राधिकरण तसेच शाखा व विभागीय कार्यालयाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत सूचनाकर्त्यांनी कलम १२७ *(१)* अन्वयेची सूचना दिनांक २४ ऑगस्ट २०२० रोजी बजावल्याबाबतची पोचप्रत सादर केली व नियोजन प्राधिकरणाने सदर सूचना प्राप्त झाल्याची बाब मान्य केली. तसेच सूचनेच्या प्राप्तीपासून अधिनियमात विहित दोन वर्षांच्या कालावधीत संबंधित आरक्षणाच्या भूसंपादनासाठी आवश्यक असलेली परिपूर्ण व कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य कार्यवाही पूर्ण झालेली नसल्याची बाब नियोजन प्राधिकरणामार्फत बैठकीत स्पष्ट करण्यात आली ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे उप-कलम *(१)* चे तरतुदीनुसार उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले असून, उक्त अधिनियमाच्या कलम १२७ चे उप-कलम *(२)* चे तरतुदीनुसार, उक्त जमीन मालकाच्या उक्त जमिनीवरील

उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबत आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्रमांक टीपीएस-१८१३/३२११/प्र.क्र. ५०८/नवि-१३, दिनांक १ डिसेंबर २०१६ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरण असलेल्या नगरपरिषदा/नगरपंचायती आणि जिल्हा परिषद यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* चे तरतुदीन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार उक्त अधिनियमाच्या कलम १५१ चे तरतुदीन्वये संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* चे तरतुदीन्वये संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे या आदेशान्वये खालील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त अधिसूचनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झालेले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत.

अटी

अट क्रमांक १- सूचनाकर्ते यांनी त्यांचे सूचनेंतर्गत जागेचा अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा सादर केलेला नसल्याने सदर आदेशामध्ये नमूद क्षेत्राबाबत भविष्यात कोणताही वाद अगर तक्रार उद्‌भवल्यास त्यास अर्जदार स्वत: जबाबदार राहतील.

अट क्रमांक २- सदरच्या आदेशाच्या अनुषंगाने भाग नकाशे अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित जमीन मालकांनी सूचनेखालील त्यांचे जागेचा भूमी अभिलेख विभागाकडील अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा संबंधित नियोजन प्राधिकरणास सादर करणे आवश्यक राहील.

परिशिष्ट

नगरपरिषद, मौजे, तालुका व जिल्हा	उक्त मंजूर विकास योजनेतील आरक्षण व विकास योजना अहवालानुसार अंदाजे क्षेत्र	उक्त सूचनेखालील उक्त जमिनींचा तपशील	उक्त आरक्षणाचे व्यपगत झालेले अंदाजे क्षेत्र
१	२	३	४
नंदुरबार नगरपरिषद, मौजे नंदुरबार, तालुका व जिल्हा नंदुरबार.	आरक्षण क्रमांक ११- "खेळाचे मैदान", (क्षेत्र १५६०० चौरस मीटर).	सर्व्हे नंबर ६८९/९८ पै. (जुना स.नं. १३९-अ+ब/ १-अ ते ६-अ प्लॉट नंबर ९८).	४६१२.२० चौरस मीटर

टिपा : (१) उक्त आरक्षणातून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर व मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकास उपलब्ध होईल.

(२) उक्त आरक्षणातून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणाऱ्या उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा मुख्याधिकारी, नंदुरबार नगरपरिषद, नंदुरबार, जिल्हा नंदुरबार यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ १ महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

(३) सदर आदेश संचालनालयाच्या ***www.dtp.maharashtra.gov.in*** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

जितेंद्र लक्ष्मणराव भोपळे,
संचालक, नगररचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे, १८ जून २०२६.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

Town Planning and Valuation Department

ORDER

The Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966

No. D.T.P/D.P.Nandurbar/Sec-127*(2)*/Order/S.No.689 Pt./O.S.No.139P./C.R. No. 217/TPV-IV/ 3298/ 2026.– Whereas, the Revised Development Plan (Original Limit + Extended Limit) of Nandurbar Municipal Council has been sanctioned under the provisions of Section 31 *(1)* of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 (Mah. Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* it's Notification No. TPS-1504/C.R.66/05(B)/UD-09, dated 14th March 2007 and the same has come into force with effect from dated 30th April 2007 (hereinafter referred to as "the said sanctioned Development Plan");

and whereas, in the said sanctioned Development Plan, land bearing S. No. 139 Pt., S. No. 140 Pt., S. No. 148 Pt., S. No. 570 Pt. of mouje Nandurbar, taluka and district Nandurbar is affected by Reservation namely Site. No. 11- "Playground" (hereinafter referred to as "the said Reservation");

and whereas, the Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservation is the Municipal Council, Nandurbar (hereinafter referred to as "the said Apropriate Authority");

and whereas, the said Appropriate Authority has not acquired the land under the said Reservation within a period of 10 (ten) years from the date on which the said Reservation came into force;

and whereas, the owner of the land (hereinafter referred to as "the said Land Owner") affected by the said Reservation in respect of the land bearing mouje Nandurbar, taluka and district Nandurbar, bearing Computerised S. N. 689/98 Pt. (Old S.No.139-A+B/1 to 6-A, Plot No. 98) (hereinafter referred to as "the said Land") had served a Notices to Appropriate Authority on dated 24th August 2020 under the provision of Section 127 *(1)* of the said Act (hereinafter referred to as "the said Notice") which was received by the said Appropriate Authority on dated 24th August 2020;

and whereas, the said Land under the said Reservation is not aquired or no steps for acquisition of the said Land as required under the provisions of Section 127 *(1)* of the said Act have been taken by the said Appropriate Authority, within a stipulated period after the date of service of the said Notice;

and whereas, the Chief Officer, Municipal Council, Nandurbar *vide* letter No. 1045/2023, dated 5th September 2023 and letter No. 1166/2024, dated 6th August 2024, the Assistant Director, Town Planning, Nandurbar Branch, Nandurbar *vide* letter No. 1103, dated 23rd September 2025 and Joint Director, Town Planning, Nashik Division, Nashik *vide* letter No. 1885, dated 12th December 2025 has informed that it would be appropriate to issue a notification under the provisions of Section 127 *(2)* of the said Act in the matter;

and whereas, for the purpose of re-verifying the facts of the case, the receipt of the Notice and the action taken regarding the land acquisition proceedings pursuant to the said Notice, an online meeting was convened on dated 8th June 2026 under the Chairmanship of the Hon. Director of Town Planning. The Noticer, the Planning Authority, Branch Offices officers and the Divisional Offices attended the meeting. During the meeting, The Noticer produced a copy of service of the Notice under Section 127 *(1)* on dated 24th August 2020 and the Planning Authority admitted receipt of the said Notice. Further, the Planning Authority clarified during the meeting that the complete and legally valid steps required for acquisition of the land under the concerned reservation had not been completed within the statutory period of two years prescribed under the Act from the date of receipt of the notice;

and whereas, in accordance with the provisions of Section 127 *(1)* of the said Act, the said Reservation on the said Land has lapsed, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue an order under the provisions of Section 127 *(2)* of the said Act, regarding the lapsing of the said Reservation on the said Land of the said Land Owner;

and whereas, the Government in Urban Development Department under the provisions of Section 151 of the said Act *vide* Resolution No. TPS-1813/3211/C.N.508/UD-13, dated 1st December 2016, has delegated the powers exercisable by it to take action under the provisions of Section 127 *(2)* of the said Act, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune in respect of the Development Plans of all Municipal Councils/Nagarpanchayats and Zilla Parishads as a Planning Authority.

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune by this order and as mentioned in the schedule hereinafter hereby notifies the lapsing of the said Reservation in respect of the said Land in the said sanctioned Development Plan under the provision of Section 127 *(2)* of the said Act and for that purpose amends the said Notification, as follows:

Conditions

Condition No. 1- Since the Noticer have not submitted an recent and certified Mojani Sheet of the said Land, the Noticer themselves will be responsible for any dispute or complaint arising in the future regarding the area mentioned in the said Order.

Condition No. 2- Before authenticating the part plan in accordance with the said Order, the concerned land owners will be required to submit a recent and certified Mojani Sheet of their proposed area from the Land Records Department to the concern Planning Authority.

Schedule

Municipal Council, Mouje, Taluka, District	Reservation of the said sanctioned Development Plan and it's Approximate Area as Development Plan Report	Description of the said Land under the said Notice	Approximate Area lapsed from the said Reservation
1	2	3	4
Nandurbar Municipal Council, taluka Nandurbar, district Nandurbar.	Reservation No. 26 - "Playground" (Area 5600 sq.mtrs.).	S.No.689/98, (Old S.No.139-A+B/1-A to 6-A, Plot No. 98).	4612.20 sq. mtrs.

Notes : (1) The said Land so released from the said Reservation shall become available to the said Land owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said sanctioned Development Plan.

(2) A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the area of the said Land which are lapsed from the said Reservation, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Nandurbar, district Nandurbar during office hours on all working days for inspection to public upto One month.

(3) This Order shall also be published on the Directorate's official website **www.dtp.maharashtra.gov.in**

JITENDRA LAXMANRAO BHOPLE,
Director of Town Planning,
Maharashta State, Pune.

Pune, 18th June 2026.

जिल्हाधिकारी यांजकडून

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये.

अधिसूचना

जिल्हा धुळे

क्रमांक भूसंपादन-१/कावि/एसआर-४२/२०२२/मौजे देवपूर, ता.जि.धुळे/सन २०२६.— ज्याअर्थी, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक १, धुळे यांनी पुढील अनुसूची "एक" मध्ये नमूद केलेल्या जमिनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची "एक" मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनी, अनुसूची "दोन" मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत किंवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक १, धुळे यांचेकडेस सदर प्राथमिक अधिसूचनेवर एकही हरकत प्राप्त झालेली नाही. त्याबाबतचा अहवाल उक्त अधिनियमाच्या कलम १५ अन्वये समुचित शासन तथा जिल्हाधिकारी, धुळे यांना सादर केलेला आहे. सदर अहवाल विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनी संपादन करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनींची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची "तीन" मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची "चार" मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक १, धुळे यांस पदनिर्देशित करीत आहेत.

सदर जमिनींचे नकाशे व अन्य अभिलेख कार्यालयीन वेळेत उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक १, धुळे यांच्या कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध राहतील.

अनुसूची - एक

जमिनींचे वर्णन

जिल्हा धुळे, तालुका धुळे, मौजे देवपूर धुळे

गट नंबर/ सिटी सर्व्हे नंबर		संपादन करावयाचे क्षेत्र
१		२
		चौ. मी.
सर्व्हे नंबर ५७, ५८ मधील भूखंड क्रमांक २२, (सि.स.नं. ७५६२).	..	३२.०६
सर्व्हे नंबर ५७, ५८ मधील भूखंड क्रमांक २३, (सि.स.नं. ७५५९).	..	३०.३७
एकूण	..	**६२.४३**

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव : मौजे देवपूर धुळे, तालुका-जिल्हा धुळे येथील सर्व्हे नंबर ५७, ५८ वरील भूखंड क्रमांक २२ व २३ (सि.स.नं. ७५६२ व ७५५९) खालील १५ मीटर विकास योजना रस्त्याने बाधित ६२.४३ चौरस मीटर क्षेत्राचे भूसंपादन प्रस्ताव.

प्रस्तावाचे प्रयोजन : मौजे देवपूर धुळे, तालुका-जिल्हा धुळे येथील सर्व्हे नंबर ५७, ५८ वरील भूखंड क्रमांक २२ व २३ (सि.स.नं. ७५६२ व ७५५९) खालील १५ मीटर विकास योजना रस्त्याने बाधित ६२.४३ चौरस मीटर क्षेत्राचे भूसंपादन प्रस्ताव.

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

सदर प्रकल्पाच्या कामामुळे एकही व्यक्ती/कुटुंब राहत्या घरातून विस्थापित होणार नसल्याने पुनर्वसाहत क्षेत्राबाबतचा तपशील निरंक आहे.

अनुसूची - चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश : सदर प्रकल्पाच्या कामामुळे एकही व्यक्ती/कुटुंब राहत्या घरातून विस्थापित होणार नसल्याने पुनर्वसन व पुनर्वसाहत क्षेत्राबाबतचा तपशील निरंक आहे.

भाग्यश्री विसपुते (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, धुळे.

धुळे, १ जुलै २०२६.

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ अन्वये

प्राथमिक अधिसूचना

जिल्हा नाशिक

क्रमांक भूसं/कक्ष/१०/३/कावि/१९०/सन २०२६.—ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड *(इ)* च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७ (भाग-२)/अ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(झेड-ए)* मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

